दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ५८ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.१९ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# भारताचे तिसऱ्यांदा विश्वविजयाचे स्वप्न भंगले

## ऑस्ट्रेलिया सहाव्यांदा विश्वचषक विजेता;हेडची मॅच विनिंग खेळी;कोहली प्लेअर ऑफ द टूर्नामेंट



**अहमदाबाद –** विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत पहिल्या दहा सामन्यांत भारतीय फलंदाजांनी फेरारीच्या वेगात गाडी चालवली, परंतु अंतिम शर्यतीत तिची बैलगाडी झाली. अवघ्या २४० धावाच त्यांना करता आल्या. ऑस्ट्रेलियाने हे आव्हान सात गडी राखून पार केले आणि अजिंक्यपदाचा षटकार ठोकला. त्यामुळे विश्वकरंडक जिंकण्याचे भारताचे स्वप्न पुन्हा धुळीस मिळाले. यासोबतच कोट्यवधी भारतीय क्रिकेटरसिकांचा स्वप्नभंग झाला.स्पर्धेतील सर्व दहा सामने आणि आजचा अंतिम सामना हे पूर्णपणे विरोधाभासी होते. अंतिम सामन्याचे दडपण प्रामुख्याने फलंदाजांना पेलवले नाही. मानसिकता तेथेच कमकुवत झाली. अक्षरशः धावांसाठी झगडावे लागले. पहिल्या १० षटकांत दोन बाद ८० आणि नंतरच्या ४० षटकांत ८ बाद १६० अशी अवस्था झाली तेथेच ८० टक्के सामना गमावला होता. त्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या विजयाचा शिलेदार ट्रॅव्हिस हेडने शतकी खेळी साकार करून दोन्ही संघातला फरक स्पष्ट केला.विश्वकरंडक स्पर्धा सुरू झाल्यापासून भारतीय संघाने फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा सर्वच आघाड्यांवर जोरदार कामगिरी करून तमाम



क्रीडारसिकांच्या आशा उंचावल्या होत्या. भारतीय संघ २०११ नंतर यंदा पुन्हा एकदा विजेतेपदाचा करंडक जिंकणार असा विश्वास वाटू लागला होता, मात्र अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंनी भारतीय संघाला लयच सापडू दिली नाही.पहिल्या दोन सामन्यांत पराभव पत्करल्यानंतर आपल्या चुका सुधारत ऑस्ट्रेलियाने जोरदार कामगिरी केली. दोन्ही तुल्यबळ संघ असल्यामुळे अंतिम सामना रोमहर्षक होईल अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात सामन्यातील काही क्षण वगळता संपूर्ण सामन्यावर ऑस्ट्रेलियाने वर्चस्व राखले.





**आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पपेतून यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने महानगरपालिकेच्या पटांगणावर विश्वचषकातील अंतिम सामन्याचे थेट प्रक्षेपण एलईडी स्क्रिनवर करण्यात आले होते. यावेळी भारत विरुध्द ऑस्टलियाचा सामना पाहण्यासाठी क्रिकेट प्रमींनी मोठी गर्दी केली होती. या प्रसंगी आमदार किशोर जोरगेवार यांनी सुध्दा येथे उपस्थित होत या अतिंम सामन्याचा आनंद घेतला.**

# जिल्हास्तर युवा महोत्सवा मध्ये उत्स्फुर्तपणे सहभागी व्हा

## २५ नोव्हेंबर पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

युवकांचा सर्वांगीन विकास करणे, संस्कृती व परंपरांचे जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागणे, यासाठी प्रतिवर्षी राष्ट्रीय व राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. राज्यात सन २०२३-२४ या वर्षातील युवा महोत्सवाचे आयोजन क्रीडा व युवक सेवा संचालनालय तसेच कृषी आयुक्तालय, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने करण्यात येणार आहे.चंद्रपूर येथे होणाऱ्या जिल्हास्तर युवा महोत्सवामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, महिला मंडळ यांनी आपल्या अधिनस्त युवक-युवतींना युवा महोत्सवामध्ये उत्स्फुर्तपणे सहभागी होण्याकरीता २५ नोव्हेंबर २०२३ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे प्रवेश निश्चित करण्याकरिता सुचित करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड यांनी केले आहे.युवा महोत्सवामध्ये (१) सांस्कृतीक, समुह लोकनृत्य, वैयक्तिक सोलो लोकनृत्य, लोकगीत, वैयक्तिक सोलो लोकगीत, (२) कौशल्य विकास, कथा लेखन, पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, इंग्रजी व हिंदी फोटोग्राफी, (३) संकल्पना आधारीत स्पर्धा, तृणधान्य उत्पन्न वाढीसाठी विज्ञानाचा वापर, सामाजिक विकासात विज्ञानाचे योगदान, (४) युवा कृती, हस्तकला, वस्त्रोद्योग, ग्रो प्रोडक्ट या स्पर्धात्मक बाबींचे आयोजन करण्यात येणार आहे.

**युवा महोत्सवासाठी आवश्यक पात्रता :**
**जिल्हास्तर युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील कृषी महाविद्यालये, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, महिला मंडळ, युवा मंडळे तसेच १५ ते २९ वयोगटातील युवांना सदर महोत्सवामध्ये सहभाग घेता येईल. सदर युवक युवती महाराष्ट्राचा रहिवासी असावा. स्पर्धकांनी नाव, पत्ता, जन्म दिनांक, संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी व वयाबाबतचा सबळ पुरावा सुध्दा सादर करणे आवश्यक आहे. सहभागी युवक, युवतींना सहभाग व प्राविण्य प्रमाणपत्र वितरीत करण्यात येईल. तसेच युवा महोत्सवातील प्राविण्यधारकांसाठी रोख पारितोषिक देण्यात येणार आहेत.**

# पोलिसांचे दुर्लक्ष,नागरिक त्रस्त

**आष्टी । प्रतिनिधी**

येथून काही अंतरावर अमरावती जिल्ह्याला लागून असलेल्या बेलोरा (बु.) येथे गेल्या एक-दोन वर्षांपासून चोरीचे प्रमाण वाढले आहे. किराना दुकान, पानठेला, शेतातील विहिरीमधील मोटारपंप चोरून नेत आहेत. या भुरट्या चोरट्यांकडून शेतातील झटका मशीन तसेच बॅटरी व स्प्रिंकलर चोरी होऊ लागले आहे. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिक त्रस्त झाले असून याकडे मात्र पोलिसांचे दुर्लक्ष झाले आहे.

स्थानिक गंगाधर विश्वनाथ जाणे (७०) यांच्या शेतात रानडुक्कर, रोही रात्रीला येऊन पराटीची बोंडे खातात. पराटी पीकाचे संरक्षण व्हावे, यासाठी तिवसा येथून जुलाई २०२३ ला १५ हजार रुपये किंमतीची सोलर झटका मशीन, बैटरी, सोलर प्लेट इत्यादी साहित्य खरेदी केले. शेतातील पिकाच्या संरक्षणाकरीता शेतात लावले. मात्र चोरट्यांनी सोमवारी (ता. १३) शेतातून झटकामशीनचा संचच चोरीला गेला. बेलोरा शिवारातून गेल्या एक वर्षात विहरीच्या मोटारी स्पिनकलर सट, नवजल, पाण्याच्या मोटार व केबल, गावातील रस्ता भूमिपूजनाचे लोखंडी बोर्ड, किराणा दुकान फोडणे इत्यादी घटना घडल्या. चोरीच्या घटनांची पोलिस दरबारी नोंदही करण्यात आली. मात्र चोरटे अद्याप पोलिसांच्या हाती लागले नाही. या चोरिचे प्रमाण वाढतच असून यावर पोलिसांचा वचक उरलेला नसल्याचे दिसून येत आहे. गंगाधर जाणे हे पोलिस ठाण्यात रिपोट देण्याकरीता गेले असता त्यांना तेथे उपस्थित असलेले पोलिस उपनिरीक्षक उंदीरवाडे आणि जमादार घावट यांच्याकडून उड़वाउडवीची उत्तरे मिळाली. यापूर्वीसुद्धा बरेचदा चोऱ्या झाल्या, पण अजूनपर्यंत पोलिसांना चोरांना पकड़ण्यात यश आले नाही.

# शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी सरसावले पालकमंत्री मुनगंटीवार

## सोयाबीन, कापसाच्या पिकांच्या नुकसानी बाबत मुख्यमंत्र्यांकडे केली मागणी



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

पावसातील खंड, अनियमित हवामान यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील सोयाबीन व कापसाच्या पिकांवर मोठ्या प्रमाणावर रोगाचा प्रादुर्भाव झाला. त्यामुळे पिकांची मोठी हानी झाली. जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासादायक नुकसान भरपाईची गरज असून यासंदर्भात निर्देश देण्याबाबत राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी १७ नोव्हेंबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्र देत मागणी केली आहे.सोयाबीन पिकावर मुळकुज, खोडकुज, रायझेक्टानिया एरीयल ब्लाईट आदी रोगांचा प्रादुर्भाव झाला होता. या पिकांची ना.मुनगंटीवार यांनी प्रत्यक्ष पाहणी केली होती. पिकांच्या नुकसानाची कारणमिमांसा तसेच भविष्यात उपाययोजना करण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ज्ञांनी संयुक्त पाहणीचे निर्देश ना.मुनगंटीवार यांनी दिले होते. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ज्ञांनी चंद्रपूर जिल्ह्यातील शेतशिवारात जाऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीच्या आधारे तज्ज्ञांनी शासनाला अहवाल सादर केला आहे.आपत्तीच्या या काळात शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे, असे नमूद करीत पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पंचनाम्यांच्या अहवालाच्या आधारावर चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासादायक नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

# क्रीडा मंत्री संजय बनसोडे २० नोव्हेंबर रोजी चंद्रपुरात

**चंद्रपूर । प्रतिनिधी**



क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विकास तथा परभणीचे पालकमंत्री संजय बनसोडे २० नोव्हेंबर २०२३ रोजी चंद्रपूर जिल्ह्याच्या दौ-यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.२० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता आगमन व शासकीय विश्रामगृह येथे राखीव. दुपारी १२ वाजता नियोजन सभागृह येथे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा पूर्व तयारी बैठकीला उपस्थिती, दुपारी ४ वाजता चंद्रपूरवरून नागपूरकडे प्रयाण.

# आज ठरणार महाराष्ट्र केसरी

**धाराशिव–**६५ वा महाराष्ट्र केसरी किताबासाठी सोमवारी झुंज होत असून गादी गटातून गतवेळीचा केसरी शिवराज राक्षे (नांदेड) व पृथ्वीराज मोहोळ (मुंबई उपनगर पश्चिम) तर माती गटातून गणेश जगताप (हिंगोली) व हर्षवर्धन सदगीर (नाशिक) यांच्यात अंतिम सामना होणार आहे. अंतिम सामन्यात विजयी होणारे मल्ल केसरी किताबासाठी भिडणार आहेत.धाराशिव येथील श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियमवर महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेमध्ये रविवारी शानदार लढती झाल्या. यामध्ये गादी व माती गटातील केसरी गटाच्या लढतींना प्रेक्षकांचा जोरदार प्रतिसाद मिळाला. गादी विभागात उपांत्य फेरीत (सेमीफायनल) शिवराज राक्षे व संग्राम पाटील (कोल्हापूर) यांच्यात जोरदार लढत झाली. मात्र, सुरुवातीपासूनच राक्षे पाटलावर भारी ठरला. त्याने १०-० ने विजय मिळवला. दुसऱ्या उपांत्य फेरीत मोहोळ व हर्षद कोकाटे (पुणे शहर) यांच्यात सुरुवातीला



चुरस निर्माण झाली. मात्र, मोहोळ ५-० ने यशस्वी झाला. माती विभागात उपांत्य फेरीचा गणेश जगताप व तानाजी झुंझुरके (अमरावती) यांच्यात सामना झाला. मात्र, जगतापने तानाजीला थेट चिटपट केले. नंतर हर्षवर्धन सदगीरने सोलापूरच्या महेंद्र गायकवाडला ६ - १ ने नमवले.यामध्ये राक्षेने सारंग सोनटक्केचा (मुंबई), संग्राम पाटीलने या महाराष्ट्र केसरी बालारफिक शेखचा (बुलढाणा) हर्षद कोकाटेने वैभव रासकचा (मुंबई), मोहोळने तुषार ढुबेचा (पुणे जिल्हा) गादी गटात पराभव केला. माती विभागात जगतापने श्रीमंत भोसलेचा पराभव केला.



# संपादकीय

## विज्ञान संशोधनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता

विविध प्रकारच्या विज्ञान संशोधन प्रक्रियेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता निश्चितच वरदायी आणि वेगवान संशोधनासाठी उपयुक्त आहे. तथापि, त्याचा वापर तारतम्याने आणि विवेकाने करणे अगत्याचे आहे.'जो हुकूम मेरे आका', असं म्हणत आपल्या इच्छांची पूर्तता करणारे सिरी, अलेक्सा यांच्यासारखे अभासी सहायक (ींळीीरश्र रीीळींरपींी) आपल्याशी संवाद साधणारे इतर चॅटबॉट, विचारलेल्या प्रश्नांना चुटकीसरशी उत्तरं देणारी 'चॅटजीपीटी'सारखी प्रणाली, स्वयंचलित मोटारगाडीसारखी साधनं, या कोणे एकेकाळी परीकथेतील किंवा विज्ञानकथेतील अद्भुत कल्पना होत्या.पण आज त्या केवळ कल्पना न राहता वास्तवाचा, आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनत चालल्या आहेत. त्यामुळे यांसाठी आधारभूत असलेली आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) अर्थात 'कृत्रिम बुद्धिमत्ता' ही आजच्या प्रचंड वेगाने विकसित होत असलेल्या जगातील परवलीची संकल्पना झाली आहे.कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे मशीनद्वारे, विशेषतः संगणक प्रणालीद्वारे मानवी बुद्धिमत्ता प्रक्रियांचे ळीींश्रींळेप (अनुकरण) करणे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकसनासाठी मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण डाटा उपलब्ध करून दिला जातो. यात दिलेल्या नमुन्यांचे विश्लेषण करून, त्यातील सहसंबंध अभ्यासून, लर्निंग (शिकणं), रिझनिंग (तर्क लढविणं) यांसारख्या कौशल्यांद्वारे कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास होतो.'मशीन लर्निंग सॉफ्टवेअर प्लिकेशन्स' उपलब्ध डाटाचा इनपुट म्हणून वापर करून भविष्यातील स्थितींबद्दल अंदाज व्यक्त करतात. डीप लर्निंग हा मशीन लर्निंगचा एक उपसंच मेंदूची रचना कशी आहे, याविषयीच्या आपल्या ज्ञानावर आधारित आहे.डीप लर्निंगच्या अंतर्गत असलेलं प्रतिमा ओळखण्याचे साधन लाखो उदाहरणांचे पुनरावलोकन करून प्रतिमांमधील वस्तू ओळखायला, त्यांचे वर्णन करायला शिकू शकते. नवीन, वेगाने सुधारणारी जनरेटिव्ह कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रे वास्तववादी मजकूर, प्रतिमा, संगीत इत्यादींची निर्मिती करू शकतात.अनेक क्षेत्रांतली परिमाणे बदलत असलेल्या या विज्ञानाधारित कृत्रिम बुद्धिमत्तेचा खुद्द विज्ञान क्षेत्रावर प्रभाव पडला नसता तरच नवल! खरं तर 'विज्ञान क्षेत्रावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव' या विषयाचा आवाका खूपच मोठा आहे. परंतु लेखाची शब्दमर्यादा लक्षात घेता या लेखात त्यातील काही निवडक मुद्द्यांच्या अनुषंगाने जाणून घेऊ या.पारंपरिक वैज्ञानिक पद्धतीनुसार आपण निरीक्षणांद्वारे निसर्गाबद्दल शिकत आलो आहोत. उदाहरणार्थ, जोहान्स केप्लरने टायको ब्राहेच्या ग्रहांच्या स्थानांच्या तक्त्यांचा अभ्यास करून 'ग्रह लंबवर्तुळाकार कक्षेत फिरतात' असे अनुमान काढले. त्यानंतर सिम्युलेशन (अनुकरण) या तंत्राचा वापर होऊ लागला. यात उपलब्ध डाटावर आधारित मॉडेल तयार केलं जातं आणि त्याबरहुकूम पुढील अंदाज व्यक्त केला जातो.अंतरिक्षातील खगोलीय वस्तूंच्या आतापर्यंतच्या हालचालींवर आधारित मॉडेल बनवून भविष्यात त्यांची एकमेकांशी टक्कर कधी होईल, असा अंदाज लावणं अशा अनुकरणामुळे शक्य होतं. निरीक्षण आणि अनुकरण यांमुळे शास्त्रज्ञ गृहीतके निर्माण करू शकतात. ज्यांची नंतर पुढील निरीक्षणांसह चाचणी करता येते. कृत्रिम बुद्धिमत्तेअंतर्गत या दोन्हीच्या पुढे जाऊन 'जनरेटिव्ह मॉडेलिंग'सारख्या मार्गाचं अनुसरण होऊ शकतं.मोठ्या प्रमाणावर डाटावर प्रक्रिया करण्याची, तसेच त्याचं विश्लेषण करण्याची कृत्रिम बुद्धिमत्तेची क्षमता वैज्ञानिक संशोधनाच्या दृष्टीने अत्यंत मोलाची आहे. यामुळे नवीन औषध शोधांपासून ते हवामान मॉडेलिंगपर्यंत अनेक प्रकारचं संशोधन विस्तारण्यासाठी आणि गतिमान करण्यासाठी शक्तिशाली मशीन लर्निंग सिस्टिमचा अंतर्भाव केला जातो.वैज्ञानिक चौकशीचा (ीलळशपींळषळल ळपर्ििींळू) भाग असलेली गृहीतक निर्मिती, डाटा विश्लेषण, सिम्युलेशन आणि चाचणी या पद्धतींवर एकत्रित कार्य करण्याची क्षमता अधिक असल्याने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर गुंतागुंतीच्या वाटणाऱ्या वैज्ञानिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी फायद्याचा ठरतो. विज्ञान संशोधनासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करताना पुढील गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे.

विज्ञान संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करताना समोर असलेली आव्हाने :

१) सर्वसाधारण मजकूर आणि प्रतिमानिर्मितीसाठी आवश्यक डाटाशी तुलना केल्यास वैज्ञानिक संशोधनासाठी लागणाऱ्या प्रायोगिक किंवा निरीक्षणात्मक डाटाच्या बाबतीत अचूकता अतिशय मोलाची आहे. डाटाची गुणवत्ता महत्त्वाची असल्याने हा डाटा काळजीपूर्वक रचना केलेल्या प्रयोगांतून निष्पन्न झालेला असणं गरजेचं आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या डाटाची उपलब्धता तुलनेने अवघड आणि महाग आहे.

२) हेही लक्षात घ्यायला हवं की, अनेक वैज्ञानिक नवकल्पना नमुनेदार डाटाऐवजी विसंगत (रपोरश्रीी) डाटा समजून घेण्यावर अवलंबून असतात. कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी उपलब्ध डाटा बऱ्याचदा नमुनेदार (ींूळिलरश्र) असण्याची जास्त शक्यता आहे.

३) विज्ञानात उपलब्ध डाटावर आधारित अंदाज बांधण्याइतकंच त्या डाटाच्या उगमासाठी कारणीभूत अंतर्निहित यंत्रणेची पाळंमुळं शोधणं, हेही महत्त्वाचं आहे. डाटाचे मॉडेल-फ्री पद्धतीने विश्लेषण केल्यास त्या अभ्यासाचे आउटपुट डाटाला सारांशित करेल; परंतु डाटाचा अर्थ लावणार नाही.

४) विज्ञानात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्र यशस्वीरित्या लागू करण्यासाठी संशोधन प्रश्नांना सर्वोत्तमरीत्या कसे मांडायचे याचा मूलगामी पुनर्विचार करणे आवश्यक आहे.

कामे सोपी अन् वेगवान

विज्ञान संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्तेचाच वापर करण्याची उदाहरणे :

१) आकाशगंगा उत्क्रांत होत असताना होणाऱ्या भौतिक बदलांची तपासणी करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'जनरेटिव्ह मॉडेलिंग'चा वापर करण्यात येत आहे.

२) प्रथिनांच्या संरचनेचं निर्धारण करणं हे तांत्रिकदृष्ट्या किचकट काम मशीन लर्निंग पद्धती वापरून सुलभ होते.

३) सतत होणाऱ्या हवामान बदलांमुळे डाटावरून विश्वसनीय अंदाज लावणे आव्हानात्मक असते. त्यासाठी आता मशीन लर्निंगचा उपयोग केला जाऊ लागला आहे.

४) कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून अंटार्क्टिक हिमखंडांचे ०.०१ सेकंदात नकाशा बनवले गेले. न्यूरल नेटवर्कवर आधारित 'एआय' प्रणालीने मानवापेक्षा दहा हजार पट अधिक वेगाने हे कार्य पूर्ण केले.

५) डीपस्क्रीन, डीपकेमसारख्या 'एआय' टूल्समुळे मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेल्या डाटाचे वेगाने विश्लेषण करणे, नवीन रेणूंची रचना करणे, संभाव्य औषधांच्या परिणामकारकतेचा अंदाज लावणे अशी कार्ये अधिक कार्यक्षमतेने करता येत आहेत.

६) खगोलशास्त्रासाठी 'एआय'चा एक फायदा म्हणजे दुर्बिणी, उपग्रह आणि इतर उपकरणांमधून मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झालेल्या डाटाचे द्रुत आणि अचूकपणे विश्लेषण करण्याची आणि त्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता. यामुळे खगोलशास्त्रज्ञांचा बराच वेळ आणि मेहनत वाचते.थोडक्यात, कृत्रिम बुद्धिमत्ता, शोध प्रक्रियेला गती देऊन विज्ञान संशोधन क्षेत्रावर आपला वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटवीत आहे. मशीन लर्निंग अल्गोरिदम, व्हर्च्युअल असिस्टंट आणि सिम्युलेशन यांसारख्या तंत्रांचे एकत्रीकरण जीनोमिक्स, औषधशोध आणि पदार्थविज्ञान यांसारख्या क्षेत्रात नवीन शक्यतांचा मार्ग मोकळा करत आहे. विज्ञान संशोधन क्षेत्रातील एरवी किचकट, वेळखाऊ, खूप मेहनतीची आवश्यकता असलेली कार्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे सुलभ होत आहेत.दिवसेंदिवस विकसित होणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्तेत वैज्ञानिक संशोधनाचे भविष्य घडवण्याचं अफाट सामर्थ्य आहे. अर्थात, हे तंत्रज्ञान दुधारी शस्त्र असल्यामुळे त्याची निर्मिती, विकसन आणि वापर करताना कुठे थांबायचे ते कळणे, मानवाने या बाबतीत तारतम्य बाळगणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे न कळल्यास, मानवासाठी वरदायी ठरत असलेलं हे तंत्रज्ञान 'स्वतःच्या हाताने स्वतःच्याच पायावर मारलेली कुऱ्हाड' ठरेल.

# नवभारताचा नवनायक



तो प्रत्येक धाव वेगाने घेतो. त्याला प्रत्येक धावेचे महत्त्व माहिती आहे. लॉकी फर्ग्युसनचा चेंडू अॅक्रॉस खेळून त्याने बॅकवर्ड स्क्वेअर लेगच्या दिशेने फटकावला आणि पहिली धाव नेहमीप्रमाणे वेगाने घेतली. त्यामुळेच त्याला पन्नासावे वन-डे शतक पूर्ण करणारी दुसरी धाव घेता आली होती. या धावेमुळे त्याने सचिन तेंडुलकरचा ४९ वनडे शतकांचा विक्रम मागे टाकला होता. ही त्याची धाव घेतानाची चपळाई त्याची धावांची भूक दाखवणारी होती; तसेच तंदुरुस्ती आणि हुशारीही.विराटने आपली खास ओळख निर्माण केली होतीच. आता त्या नावाला त्याने जागतिक विक्रमाची झळाळी दिली. त्याचा वनडेतील शतकांचा सुवर्ण महोत्सव प्रत्येक फलंदाजास प्रेरणा देणारा आहे. या विक्रमी शतकावर विराटची खास मोहोर होती. विराट मंगळवारी मैदानात आला तो 'कोहली... कोहली..' या गजरात. वानखेडे स्टेडियमने कित्येक वर्षे 'सचिन... सचिन..' हा घोष अनुभवला. विराट मैदानावर दाखल झाला, तेव्हाच रसिकांना विक्रमी शतकाचे वेध लागले होते. विराटला याची जाणीव होती; पण तो नेहमीच्याच शैलीत खेळत होता. प्रामुख्याने एकेरी-दुहेरी धावा घेऊन धावफलक हलता ठेवत होता. संधी मिळाल्यावर चौकाराची संधी सोडत नव्हता. त्याने परिस्थिती ओळखून दुय्यम भूमिका घेण्यात कमीपणा मानला नाही. कोणत्याही गोलंदाजाने आपल्यावर वर्चस्व गाजवू नये, हे त्याचे लक्ष्य असते. त्यामुळे तो मध्यमगती गोलंदाजांना तडकावण्याची, फिरकी गोलंदाजांना भिरकावून देण्याची संधी सोडत नाही. त्याने टीम साउदीला मारलेला फ्लिकचा षटकार याच प्रकारचा होता. त्याने चेंडू स्टँडमध्ये टोलवताना त्या फटक्यात नेमकी ताकद लावली होती. त्याने शतकानंतरही कधीही आपली विकेट फेकलेली नाही किंवा तो बेफिकीर झाला नाही. तो मंगळवारीही जेव्हा मैदानात आला, त्यावेळी भारतीय संघ भक्कम, विजयी धावसंख्या उभारणार हे निश्चित झाले होते. आपल्या या धावा संघासाठी जास्त मोलाच्या आहेत, याची त्याला जाणीव होती. आज तो देशाचा हिरो आहे. मात्र, त्याने त्यासाठी मेहनत घेतली आहे. त्याच्या कामगिरीत कमालीचे सातत्य आहे; तसेच व्यावसायिकताही. विराट मैदानावर असेपर्यंत आपण जिंकू शकतो, हा विश्वास असतो. तो त्याने कमावला आहे. धावांचा पाठलाग करताना तो लक्ष्यानुसार फलंदाजी करेल आणि टिकून राहील; याची खात्री चाहत्यांना असते. त्याने धावांचा पाठलाग करताना ५० पैकी २७ शतके करून हा विश्वास सार्थ ठरवला आहे. एवढेच नव्हे, तर धावांचा पाठलाग करतानाची त्याची ६५.४ ही अव्वल सरासरी त्याचे मोठेपण अधोरेखित करते. दुसऱ्या डावात बर्फ डोक्यावर ठेवून फलंदाजी करावी लागते. संयमाचा कस लागतो. त्यात विराट सर्वोत्तम ठरतो.विराटने हा विक्रम केल्यानंतरही सचिनच्या मूळ विक्रमाचे महत्त्व कमी होत नसल्याचे त्याने आवर्जून सांगितले. सचिनने आखून दिलेल्या मार्गावरून अनेक भारतीय फलंदाज भरधाव निघाले. त्यात विराटचा वेग सर्वांत जबरदस्त आहे. विराट हा नवयुवकांचे प्रतिनिधित्व करतो. तो प्रसंगी आपल्यावरील टीकेवर हसतो. सामना सुरू असताना चाहत्यांशीही संवाद साधतो. त्यांना प्रोत्साहन द्यायला सांगतो. प्रतिस्पर्ध्यांच्या विरोधात आक्रमक होतो. त्यांच्यासहित हास्यविनोदही करतो. आपण सर्वोत्तम आहोत, हे सांगायलाही तो तयार असतो; मात्र वैयक्तिक कामगिरीपेक्षा संघाचे यश मोलाचे मानतो.एका माजी क्रिकेटपटूने नुकतीच विराट केवळ स्वतःसाठी खेळतो, अशी टीका केली. फलंदाज; तसेच गोलंदाजाने वैयक्तिक खेळास, विक्रमास महत्त्व दिल्यास गैर ते काय? स्वतःसाठी केलेल्या धावा, घेतलेल्या विकेटचा संघास फायदाच होत असतो. ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार तसेच समालोचक रिकी बेनॉ फलंदाजांना एकच सल्ला देत असत, 'सामना संपेपर्यंत मैदानात रहा. संघात अकरा खेळाडू आहेत; पण कोणातरी एकाला जबाबदारी घ्यायलाच लागते. त्यावेळी टीकाकार वैयक्तिक कामगिरीस महत्त्व देणारा असे म्हणतील, आरोप करतील; मात्र जबाबदारी स्वीकारून संघ विजयी होईपर्यंत आपण मैदानात राहायला हवे, हे स्वीकारलेत की संघ जिंकायला सुरुवात होईल आणि त्यानंतर खेळाचा इतिहास तुम्हाला ग्रेट समजेल.' विराटबाबत हेच तर घडले, नव्हे त्याने घडवले. सुनील गावस्करचा मोटेरा स्टेडियमवरील तो इजाझ अहमदला मारलेला लेट कट सर्वांच्या लक्षात राहील; कारण त्याच फटक्याने गावस्करांनी दहा हजार कसोटी धावा करणारे पहिले फलंदाज होण्याचा मान मिळवला. हेच विराटच्या त्या फ्लिकबाबत, त्या दोन धावा घेताना दाखवलेल्या चपळाईबाबत म्हणता येईल. तंदुरुस्त, चिकाटी आणि वन-डे म्हणजे केवळ चौकार-षटकारांची आतषबाजी नव्हे, हे दाखवणाऱ्या त्या धावा होत्या. विराट कोहली हा आज भारतीय तरुणांच्या सळसळत्या चैतन्याचे, उर्जेचे आणि विजीगिषू वृत्तीचे प्रतीक बनला आहे. त्याची पराक्रमी वृत्ती आणि जिद्द ही नव्या भारताची ओळख आहे. विराटवर आज प्रेमाचा जो अपार वर्षाव होतो आहे, तो यामुळेच!

# कायदा गतीचा पाळा



सर्वोच्च न्यायालयासमोर १९७८ मध्ये एक जामिनाचे प्रकरण आले होते. राजस्थान राज्य सरकार विरुद्ध बालचंद, हा तो खटला प्रसिद्ध आहे. तेव्हा खंडपीठाने जगात तोवर रुळलेला 'बेल इज अ रूल अँड जेल इज अॅन एक्सेप्शन' हा आपल्या विख्यात निकाल दिला होता. तेव्हापासून हा निकाल असंख्य वेळा उद्धृत केला गेला आहे. आजही जातो. कोणत्याही आरोपीला जामीन मिळणे, हेच 'नियमित' आहे आणि त्याला कोठडी देणे हा अपवाद आहे, असे तेव्हा न्यायालयाने म्हटले होते. आरोपी जोवर खटला चालून आणि निकालपत्र जाहीर होऊन गुन्हेगार होत नाही, तोवर तो केवळ संशयित असतो. अशा वेळी त्याच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने घालणे उचित नसते. असा संशयित आरोपी जोवर कामकाजात अडथळा आणत नाही किंवा धमक्या वगैरे देत नाही, तोवर तो बाहेर राहिल्याने बिघडत नाही. मात्र, सुप्रीम कोर्टाने आत्ता आपल्यासमोर आलेली जामिनाची सुनावणी करण्यास वेगळ्या कारणाने नकार दिला आहे. रांग मोडून अशी जामिनाची सुनावणी करणे, योग्य नाही. याचे कारण सर्वच उच्च न्यायालयांमध्ये हजारो खटले तुंबलेले आहेत. असे असताना एखाद्याच प्रकरणातील आरोपीच्या जामिनाची सुनावणी लवकर का घ्यायची, असा प्रश्न खंडपीठाला पडला. तो सयुक्तिक आहे. पुढे न्यायमूर्तींनी याबाबत उच्च न्यायालय योग्य तो निकाल देईल, अशी आशा आणि अपेक्षाही व्यक्त केली आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाचे न्यायमूर्ती अभय ओक आणि न्या. पंकज मिठाल यांनी या फौजदारी प्रकरणाच्या निकालासाठी कोणतीही कालमर्यादा घालून देण्यासही नकार दिला. यातल्या याचिकाकर्त्याची अशी तक्रार होती, की एका फौजदारी प्रकरणात जामीन मिळण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात जून महिन्यातच अर्ज करण्यात आला होता. मात्र, अद्याप त्याची सुनावणीच झाली नसल्याने जामीन मिळालेला नाही. या जामीन अर्जाची निदान सुनावणी तरी लवकरात लवकर व्हावी, अशी ही याचिका होती. ती सुप्रीम कोर्टाने फेटाळून लावली आहे. मात्र, यातून अनेक प्रश्न उपस्थित होतात. त्यांची उत्तरे केवळ सुप्रीम कोर्टालाच असे नव्हे तर देशातील पोलिस यंत्रणा, न्यायव्यस्था, राज्य आणि केंद्र सरकार तसेच नोकरशाही या साऱ्यांना मिळून द्यावी लागणार आहेत. न्यायालयांकडे खूप काम आहे किंवा खटल्यांची प्रचंड थकबाकी आहे; हे कारण एखाद्या संशयित आरोपीच्या मूलभूत अधिकारांच्या आड येऊ शकते का, हा यातला कळीचा प्रश्न आहे. सुप्रीम कोर्टात जामिनासाठी धाव घेणारा हा संबंधित संशयित आरोपी निश्चितच साधनसंपन्न असणार. त्याशिवाय, तो असे अर्ज तिथवर नेऊही शकणार नाही. मात्र, त्याला पुन्हा रांगेत नेऊन उभे करताना जे रांगेत उभेही राहू शकलेले नाहीत, त्यांचे काय करायचे, असा प्रश्न पडतो. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्यूरोने काही काळापूर्वी एक आकडेवारी जाहीर केली होती. तिच्यानुसार देशातील सर्व तुरुंगांमध्ये असणाऱ्या एकूण कैद्यांपैकी तब्बल ७६ टक्के हे आरोप शाबीत होऊन शिक्षा झालेले गुन्हेगारच नाहीत. ते केवळ संशयित आरोपी आहेत. त्यांचे खटले चालू किंवा प्रलंबित आहेत. मात्र, जामीन न मिळाल्याने, न मागितल्याने किंवा फेटाळला गेल्याने ते तुरुंगात आहेत. यातल्या किती जणांचे जामीन अर्ज संबंधित न्यायालयांसमोर गेले असतील, हेही सांगता येत नाही. नेमक्या आकड्यांत सांगायचे तर सन २०२१ मध्ये देशभरात पाच लाख ५४ हजार ३४ कैदी होते. त्यातले, चार लाख २७ हजार १६५ कच्चे कैदी होते. म्हणजे त्यांच्यावर कोणताही गुन्हा शाबीतच झालेला नाही. दुर्दैव म्हणजे, एकूण कैद्यांचा आकडा वाढत असतानाच त्यातल्या कच्च्या कैद्यांचे प्रमाणही वाढत चालले आहेत.सुप्रीम कोर्टाने 'रांग मोडून येऊ नका..' असे सांगणे हे 'इतरांवर अन्याय होऊ नये..' या दृष्टीने योग्यच आहे. पण कुणावरच अन्याय होऊ नये, यासाठी काय करता येईल, याचा वेगाने विचार आणि कृती करण्याची वेळ आली आहे. अनेकदा वर्षानुवर्षे शिक्षा न होता तुरुंगात राहणारा कैदी तेथेच प्रशिक्षित होऊन कट्टर गुन्हेगारही होतो. तसेच, बराच काळ तुरुंगात राहून पुढे प्रत्यक्ष सुनावणीत निर्दोष सुटणाऱ्या कैद्याचे वाया गेलेले आयुष्य कोण भरून देणार असते? त्याच्यावर न्याय मिळूनही अन्याय झालेला असतो. 'सर्व उच्च न्यायालयांमध्ये आणि विशेषकरून (मुंबईसारख्या) मोठ्या हायकोर्टांमध्ये मोठ्या प्रमाणात जामीन अर्ज प्रलंबित आहेत आणि ते निकाली काढण्यास होणारा विलंब हा टाळता येण्यासारखा नाही,' असे सुप्रीम कोर्टाने आपल्या ऑर्डरमध्ये नमूद केले आहे. देशभरात जामिनासाठी किती कैदी तळमळत असतील, याचा यावरून अंदाज यावा. सुप्रीम कोर्टाने हा एकूणच प्रश्न अग्रक्रमाने विचारात घेऊन देशातील सगळ्यांच कच्च्या कैद्यांबाबत पुढाकार घ्यायला हवा. तुमच्यापर्यंत येणाऱ्यांना तुम्ही रांगेत उभे करू शकता. पण ज्यांची तेवढीही ताकद नाही, त्यांच्यापर्यंत कोण, कधी व कसे पोहोचणार, हा खरा प्रश्न आहे. त्याला सुप्रीम कोर्टाने हात घालायला हवा.

# प्रदूषणाचा डबलबार!

फटाक्यांच्या आवाजाने गेले दोन-तीन दिवस आणि दोन-तीन रात्रीही अनेकांचे कान किटले, धुराने आसमंत झाकोळून गेला, कागदकपट्यांच्या कचऱ्याने रस्ते ओसंडले, अनेकांच्या हृदयाची धडधड वाढली. बावरलेले मुके प्राणी जीव मुठीत धरून बसले.अर्थात माणसांविषयीच्या संवेदनाच जिथे बधिर झालेल्या असतात, तिथे अन्य जीवसृष्टीची पर्वा कोण करतो? हवा आणि आवाजाच्या प्रदूषणाच्या सर्व मर्यादा लोकांनी पार केल्या. आर्थिक-सामाजिक विषयांसंबंधी वेगवेगळे जागतिक निर्देशांक काढले जातात आणि त्यातील भारताच्या घसरत्या क्रमांकावरून वाद वगैरे होतात.पण बेबंदपणे वागण्याच्या बाबतीत क्रमवारी लावली तर निःसंशय आपल्या देशाचा क्रमांक वरचे स्थान पटकावेल. प्रश्न आहे तो हे असले स्थान आपल्याला मिळवायचे आहे का हाच. यंदा दहीहंडीपासून ते सध्या चालू असलेल्या दिवाळीपर्यंतच्या सणांमध्ये ध्वनिप्रदूषणाची पातळी कमालीची चढती राहिली.त्यातही दिवाळीत हवा आणि आवाजप्रदूषण असा डबलबार आहे! हे सगळे उच्चांक वा विक्रम नसून बेजबाबदारपणाची कमाल पातळी आहे. खरे तर फटाक्यांमुळे होणाऱ्या दुष्परिणामांचा पाढा वाचण्याची गरज नाही, इतके त्याविषयी लिहून-बोलून झाले आहे.दिल्लीच्या रुग्णालयातील श्वसन विभागाच्या डॉक्टरांनी सर्वोच्च न्यायालयातील ताज्या सुनावणीत कळकळीने सांगितले की, फटाक्याच्या धुराचा लहान मुलांच्या फुफ्फुसावर अत्यंत घातक परिणाम होतो.दिल्ली, मुंबई, पुणे येथील हवेचा दर्जा खराब होत असल्याचे आकडे रोजच्या रोज अक्षरशः आदळताहेत. तरीही स्थिती ढिम्म राहणार असेल, तर समाजाला झालेले दुखणे गंभीर आहे. निर्धारित वेळेतच फटाके वाजवावेत, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला व राज्य सरकारांनी ही वेळ निश्चित करावी, अशी सूचना केली होती.राज्य सरकार या बाबतीत तत्परतेने आणि गंभीरपणे पावले उचलेल, असा 'आरोप' कोणी करू धजावणार नाही. याचे कारण सत्ता मिळाल्या मिळाल्या मुख्यमंत्र्यांनी 'आता उत्सव विनानिर्बंध साजरे करा', असे सवंग लोकप्रियतेचे विधान केले.त्याला कोरोना काळातील निर्बंधांचा संदर्भ असला, तरी त्यामागचा राजकीय रोख पुरेसा स्पष्ट होता. जेव्हा सत्ताधाऱ्यांकडून असा 'संदेश' जातो, तेव्हा खालपर्यंत त्याचे परिणाम काय होतात, हे गेल्या दोन महिन्यांत ठिकठिकाणी किंचाळणाऱ्या ध्वनिवर्धकांच्या उपद्रवावरून आणि पोलिस त्याबाबतीत केवळ बघ्याची भूमिका घेत होते, यावरून स्पष्टच झाले.आता तर एक भयंकर टूम आली असून ती वाढत चालली आहे. सार्वजनिक उत्सवांच्या वा मिरवणुकांच्या निमित्ताने प्रकाशाचे प्रखर झोत (लेसर) सोडले जातात. त्याने काहींची दृष्टी अधू झाल्याच्या, काहींना पूर्ण अंधत्व आल्याच्या बातम्याही प्रसिद्ध झाल्या. हे प्रकाशझोत समाजातील अंधार अधिक गडद होत चालल्याचे लक्षण आहे.फ्लेक्सवरची चमकोगिरी पुरेशी वाटत नसल्याने काही कार्यकर्त्यांना हे असले प्रकार म्हणजे आपल्या राजकीय कारकिर्दीची शिडी वाटत असेल तर एकूण राजकीय संस्कृतीचेही अधःपतन किती वेगाने होत आहे, याची कल्पनाच केलेली बरी.नोकरशहांनी 'हो' म्हणायला आणि राज्यकर्त्यांनी 'नाही' म्हणायला शिकले पाहिजे, असे यशवंतराव चव्हाण एकदा म्हणाले होते. परंतु आता चांगल्या कारभाराच्या कल्पनाच बदलत चालल्या आहेत की काय, असे वाटू लागले आहे. महापालिकांनी दोन तासांच्या मर्यादेविषयी परिपत्रके काढली होती, हे खरे आहे.मात्र ते निर्बंध लोकांनी भिरकावून दिले. स्थानिक स्वराज्य संस्था, सरकार, न्यायालये हे सगळेच जर केवळ सुविचार सांगणे, आवाहने करणे एवढ्यावरच समाधान मानणार असतील, तर काही बदल घडण्याची सुतराम शक्यता नाही.हे झाले व्यवस्थेच्या उदासीनतेबाबत. पण समाजानेही सध्याच्या परिस्थितीविषयी आत्मपरीक्षण केल्याशिवाय बदल घडणार नाही. फटाके म्हणजे दिवाळीच्या आनंदाचा भाग ही समजूत अनेकांच्या मनात घट्ट बसली आहे, परंतु हा आनंद नसून आनंदाचा आभास आहे.फटाके फोडण्याच्या प्रकाराला कोणताही धार्मिक आधार नाही. ना हे प्रकार पर्यावरणाला पूरक आहेत, ना शारीरिक वा सामाजिक स्वास्थ्याला. काही शाळांमधून या बाबतीत योग्य ती माहिती दिली जाते आणि त्याचे चांगले परिणामही दिसून आले आहेत.परंतु अशा सुट्या प्रयत्नांना मर्यादा असते. त्यामुळे या बदलाची चळवळच उभी करावी लागेल. दिवाळी या सणाशी कितीतरी चांगल्या गोष्टी जोडलेल्या आहेत. त्यात रांगोळी, आकाशदिव्यांचे सौंदर्य आहे, ऋतूला पूरक अशी आहाराची योजना आहे. त्यानिमित्ताने पाककलेला वाव आहे, नातेसंबंधांचे धागे दृढ करणारा, समृद्धीची उपासना करणारा हा उत्सव आहे.त्याला फटाकेमुक्त करून त्यातील खऱ्या आनंदाच्या झऱ्याला वाट मोकळी करून दिली पाहिजे. 'सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काळ सांप्रतकाळच' असे आगरकरांनी पोटतिडकीने सांगितले होते, त्याची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. त्या लेखाचा समारोप करताना त्यांनी म्हटले होते, ''...या घटकेस हातपाय न हलवणे म्हणजे जाणूनबुजून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होण्यासारखे होय.'' आजच्या परिस्थितीलाही हा इशारा तंतोतंत लागू पडतो.

# मंगळवेढ्यातील २७ उपसरपंचाच्या निवडी २४ नोव्हेंबरला



**मंगळवेढा –** तालुक्यातील २७ ग्रामपंचायतीच्या उपसरपंचाच्या निवडीचा कार्यक्रम नुकताच गटविकास अधिकारी शिवाजीराव पाटील यांनी जाहीर केला असून या २७ ग्रामपंचायतीची उपसरपंच निवड २४ नोव्हेंबर रोजी एकाच दिवशी होणार आहे.५ नोव्हेंबर मध्ये रोजी तालुक्यातील २७ ग्रामपंचायती निवडणूक प्रक्रिया पार पडली व ६ तारखेला या ग्रामपंचायत निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आला. या निवडणुकीत ब्रह्मपुरी व हिवरगाव येथील सरपंच बिनविरोध निवडले. तर शेलेवाडीच्या सरपंच पदाचा उमेदवार तीन मताने तर निंबोणीचे सरपंच पदाचे उमेदवार बिरूदेव घोगरे हे सर्वाधिक मतांनी विजयी झाले.सुनीता माळी (शेलेवाडी), सुनीता पडोळकर (पडोळकरवाडी), सुनीता रेवे (रेवे), छाया मिस्कर (महमदाबाद हु.), लक्ष्मण गायकवाड (भाळवणी), सुलोचना झंगळे(अकोला), म्हांतेश बिराजदार (लोणार), भाग्यश्री कोळी (उचेठाण), लव्हाजी लेंडवे (आंधळगाव), आमसिद्ध चौखंडे (जंगलगी), शिवाजी मेटकरी (मानेवाडी), सरस्वती थोरबोले(रड्डे), बिरूदेव घोगरे (निंबोणी), बालिका ढेकळे (देगाव), स्नेहलता पाटील (ब्रम्हपुरी बिनरोध), कमल खांडेकर (हिवरगाव, बिनरोध), संजयसिंग रजपूत (खडकी), सरुबाई लांडगे (डिकसळ), ललिता ऐवले (चिक्कलगी), दत्तात्रय माने (जुनोनी), बाळू कांबळे, अर्चना कांबळे, यशोदा पूजा कोडगर (बठाण), अनुराधा पडवळे (खुपसंगी), कृष्णाबाई चौगुले (जालीहाळ), अनिल पाटील (लक्ष्मी दहिवडी), अरुण जावळे(मुंढेवाडी), बाबासो कसबे (शिरसी), सुमन गोडसे (नंदूर) हे सरपंच पदी निवडले गेले आता उपसरपंच पदासाठी २४ नोव्हेंबर रोजी निवड होणार आहे.लक्ष्मीदहिवडी (आर. बी. गोरे), खुपसंगी (एम. टी. भोसले), आंधळगांव (एन. ए. करे), नंदुर (आर. ए. म्हेत्रे), निंबोणी (एस. एन. संकपाळ), रड्डे (पी. एन. शिवशरण), ब्रम्हपुरी (एस. बी. शिंदे), मानेवाडी (एस. के. इनामदार), जुनोनी (टी. के. कांबळे), डिकसळ (आर. के. कांबळे), पडोळकरवाडी (ए. डी. चलवादी), अकोला (डी. ए. स्वामी), शिरसी (आर. एस. जाधव), देगांव (एस. डी. लेंडवे), बठाण (पी. सी. कांबळे), शेलेवाडी (पी.बी. ढोबळे), उचेठाण (डी.व्ही. पवार), खडकी (ए.टी. कोळेकर), लोणार (आर. एस. सोनवणे), मुंढेवाडी (जे. वाय. मुलाणी), जंगलगी (आर.एस.मदभावी), भाळवणी (एस. एस. खटकाळे), रेवेवाडी ( एम. जी. पवार), महमदाबाद (हु) (के. आर. खताळ), चिकलगी (एस.पी. कांबळे), जालीहाळ/सिध्दनकेरी (डी. डी. करे), हिवरगांव ( एम.पी. जुंदळे)उपसरपंचाची निवड ही सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार आहे यावेळेस उपसरपंच निवडला सरपंचांना मत देण्याचा अधिकार असून पहिले मत देऊन समसमान झाल्यास दुसरे निर्णायक देण्याचा अधिकार देण्यात आला. त्यामुळे काठावर विरोधक असणाऱ्या ग्रामपंचायत मध्ये सरपंच हे आपलाच उपसरपंच कसा होईल याकडे लक्ष देत आहेत.

## सह्याद्री फार्मसीच्या विद्यार्थ्यांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आयोजित सोलापूर विभागीय कबड्डी स्पर्धेत सहभाग

**सांगोला । प्रतिनिधी**



डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे रायगड या विद्यापीठाने राज्यात विभागीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,सोलापूर विभागीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन एमडीए स्कूल ऑफ फार्मसी,कोळपा जिल्हा लातूर या महाविद्यालयात केले होते.या विद्यापीठस्तरीय कबड्डी स्पर्धेत एकूण १२ संघानी सहभाग घेतला होता.या स्पर्धेत सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी,मेथवडे या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी संघाने मॅच अत्यंत चुरशीने लढली.या कबड्डी स्पर्धेत चि.रमण घुटुकडे,चि.प्रफ्फुल पवार,चि.रोहन जाधव,चि.हर्षवर्धन पाटील,चि.आदित्य कोकरे,चि.स्वराज इनामदार,चि.सौरभ घेरडे,चि.सौरभ वाघमोडे,चि.विनोद पाटील चि.सौरभ सावंत,चि.अमित चौगुले, चि.अथर्व चव्हाण या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.महाविद्यालयाचा विद्यार्थी चि.सौरभ घेरडे याची पुढे होणाऱ्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. महाविद्यालयाच्या या कबड्डी संघास प्रा.डॉ.ए.एम.तांबोळी यांचे मार्गदर्शन लाभले.

## सोलापूर जिल्हा : दुष्काळाच्या यादीत ९ महसूल मंडळे नाहीत

**सोलापूर :** जिल्ह्यातील माढा, माळशिरस, करमाळा, सांगोला, बार्शी या पाच तालुक्यात यापूर्वीच दुष्काळ जाहीर झाला आहे. त्यानंतर उर्वरित सहा तालुक्यातील ४६ महसूल मंडलांचाही दुष्काळात समावेश झाला. मात्र, हवामान स्वयंचलित यंत्रे नसल्याचा फटका नऊ महसूल मंडलांना बसला आहे. त्या नऊ महसूल मंडलांचा दुष्काळाच्या नवीन यादीतदेखील समावेश होवू शकला नाही.तालुक्यातील एकूण पाऊस व हवामानाचा अंदाज घेण्यासाठी तेथील महसूल मंडलांमध्ये बसविलेल्या स्वयंचलित हवामान यंत्रांचा (पर्जन्यमापक) आधार घेतला जातो. सोलापूर जिल्ह्यात ९२ महसूल मंडले आहेत, पण नऊ मंडळांमध्ये ही यंत्रणाच नाही. त्यामुळे तालुक्यातील किंवा शेजारील महसूल मंडलातील पाऊस त्या मंडलांसाठी गृहीत धरला जातो. यंदा जिल्ह्यातच सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे.‘सकाळ’ने त्यावर सातत्याने पाठपुरावा केला आणि ‘झळा दुष्काळाच्या, पण निकषामुळे पंचाईत’ अशी वृत्तमालिका प्रकाशित केली. त्यानंतर लोकप्रतिनिधींच्या पाठपुराव्यामुळे सहा तालुक्यातील ४६ महसूल मंडलांचाही दुष्काळाच्या यादीत समावेश झाला. मात्र, नऊ महसूल मंडलांमध्येदेखील दुष्काळाची दाहकता तेवढीच असतानाही दुष्काळाच्या यादीत त्यांचा समावेश नाही. अक्कलकोट, दक्षिण सोलापूर व मंगळवेढा तालुक्यातील प्रत्येकी एक, पंढरपूर तालुक्यातील दोन तर उत्तर सोलापूर तालुक्यातील चार महसूल मंडलांचा त्यात समावेश आहे. तेथील शेतकऱ्यांसाठी आता जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

# पाचेगांव खुर्द येथे छगन भुजबळ यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन

**पाचेगांव । प्रशांत मिसाळ**



काल रविवार दि. १९ रोजी मराठा समाज आणि ओबीसी समाज यांनी सामूहिकरीत्या पाचेगांव खुर्द येथे मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन केले. यावेळी मनोज जरांगे पाटील आप आगे बढो, हम तुम्हारे साथ है , एक मराठा, लाख मराठाअशा देण्यात आल्या.राज्यात सध्या मनोज जरांगे पाटील यांची मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी आंदोलने चालू आहेत. मनोज जरांगे पाटील यांना महाराष्ट्रातून मराठा समाज तसेच ओबीसी समाज बांधवांकडून मोठ्या संख्येने पाठिंबा मिळत आहे. परंतु ओबीसीचे नेते छगन भुजबळ यांनी अंबड जिल्हा जालना येथील ओबीसी मेळाव्यातून मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीची टीका केल्यामुळे याचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटत असून त्या अनुषंगाने पाचेगांव खुर्द ता. सांगोला येथे मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे गटारीमध्ये दहन करून रोष व्यक्त करण्यात आला.सकाळी ९ वाजता गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौक हनुमान मंदिर येथे गावातील मराठा समाजातील व ओबीसी समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मराठा बांधवांनी छगन भुजबळ यांचा फोटो काठीला बांधला त्यावरती पेट्रोल टाकले आणि ओबीसी समाजातील व्यक्तीने त्यांच्या काठीला बांधलेल्या प्रतिमेला आग लावली आणि मराठा व ओबीसी एकत्र गुण्यागोविंदाने नांदत असल्याचे दाखवून दिले.गावगाड्यातील मराठा आणि ओबीसी समाज एकच असून आमच्यात भांडण लावण्याच्या प्रयत्न मंत्री छगन भुजबळ यांनी करू नये व संविधानिक पदावर असणाऱ्या व्यक्तीला न शोभणारे वक्तव्य करू नये असे यावेळी बोलताना मराठा समाज आणि ओबीसी समाजातील बांधवांनी सांगितले. मंत्री छगन भुजबळ यांनी यापुढे मनोज जरांगे पाटील व मराठा समाजाविषयी बोलताना तारतम्य बाळगून बोलावे अन्यथा मराठा समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागेल असा इशाराही समाज बांधवांच्या वतीने देण्यात आला.

## ग्रामीण भागातील दूध व्यवसायाला घरघर! दुधाचे दर कमी, पशु खाद्यांचे व चाऱ्याच्या दारात वाढ

**मोहोळ –** गेल्या साधारण महिन्या पासून कमी झालेले दुधाचे दर, तर पशुखाद्य, हिरवा चारा, चुरापेंड यांचे वाढलेले दर यामुळे ग्रामीण भागातील दूध व्यवसायाला घरघर लागली आहे. दरम्यान भविष्यातील चारा, पाणी टंचाईची चाहूल लागल्याने दावणीला असलेली दुभती जनावरे शेतकरी येईल त्या किमतीला विकू लागला आहे. त्यामुळे मोठा अर्थीक तोटा सहन करावा लागत आहे.ग्रामीण भागात शेतीला जोडधंदा म्हणून मोठ्या प्रमाणात दूध व्यवसाय केला जातो. शेतीतील उत्पन्न पीक लागवडी नंतर किमान सहा महिने तरी येत नाही, तो पर्यंत खर्चासाठी म्हणून दूध व्यवसाय फायदेशीर ठरतो. रासायनिक खताचे दर गगनाला भिडल्याने शेतकरी आता रासायनिक खता ऐवजी शेण खताकडे वळला आहे.जर्सी दुभत्या गायीच्या माध्यमातून शेतीला मोठ्या प्रमाणात शेणखत उपलब्ध होते. ज्या शेतकऱ्याकडे घरचा चारा उपलब्ध आहे त्याला दूध व्यवसाय थोडाफार परवडतो. मात्र विकत घेऊन चारा घालणे हे परवडणारे नाही. गेल्या सुमारे महिन्या पासून दुधाचे दर लिटरला चार ते पाच रुपयांनी कमी झाले आहेत. अनेक शेतकऱ्याकडे किमान दहा ते पंधरा दुभत्या जर्सी गाई आहेत.चांगले दूध देणाऱ्या गाईची किंमत ९० हजारापासून सव्वा लाखा पर्यंत आहे. मात्र भविष्यातील धोका ओळखून ९० हजाराची गाय ५० ते ६० हजाराला शेतकरी विकू लागला आहे. त्यामुळे मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. चाऱ्यासाठी म्हणून मका लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. सध्या साखर कारखाने सुरू आहेत.त्यामुळे उसाचे हिरवे वाढे उपलब्ध आहे. मात्र कारखाने बंद झाल्यानंतर चाऱ्याची मोठी अडचण होणार आहे. एकूण परिस्थिती पाहिली असता या सर्व अडचणीमुळे दूध व्यवसायाला घरघर लागली आहे.

# राज्यातील उत्तम सहकारी बँक म्हणून मुंबई जिल्हा सहकारी बँकेचे नावलौकिक

## धारावी शाखेच्या उदघाटन प्रसंगी उपमुख्यमंत्री फडणवीसांचे गौरवोदगार



**मुंबई –**मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या धारावी शाखेचे आज होत असलेले उदघाटन बँकेच्या वाटचालीतील एक महत्वपूर्ण आणि गौरवशाली बाब आहे. राज्यातील उत्तम सहकारी बँक म्हणून मुंबई जिल्हा बँकेचा नावलौकिक आहे, असे गौरवोदगार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. मुंबई बँकेच्या धारावी शाखेचा आज उदघाटन सोहळा फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.यावेळी ऑनलाईन बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अनेक संकटे, अडचणीना सामोरे जाऊन सहकार क्षेत्रात भक्कमपणे पाय रोवून ही बँक उभी आहे ही अतिशय अभिमानाची बाब आहे. त्यासाठी बँकेचे अध्यक्ष प्रविण दरेकर आणि बँकेची संपूर्ण टीम यांचे विशेष अभिनंदन करतो. बँकेने आर्थिक, तसेच सहकार चळवळीबरोबरच सामाजिक बांधिलकी विविध उपक्रमातून जपली आहे. मुंबई पोलिसांना शासनामार्फत घरे देण्यात येणार असून त्यासाठी मुंबई बँकेकडून निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. मुंबईत माथाडी कामगारांना कोणत्याही बँकेकडून कर्ज उपलब्ध करून देण्यात येत नव्हते अशावेळी त्यांच्या घरांचे स्वप्न पूर्ण व्हावे यासाठी मुंबई बँकेने जवळपास सोळाशे माथाडी कामगारांना कमी व्याज दरात घरकर्ज देऊन दाखवलेली सामाजिक बांधिलकी अजोड आहे. आजही बँकेने सामाजिक बांधिलकीतून धारावी सारख्या झोपडपट्टी भागात बँकेची शाखा सुरू केली आहे. कर्तव्य, निष्ठा आणि सामाजिक जाणीवेतून बँक उत्तरोत्तर प्रगती करत राहील असा मला विश्वास वाटतो, असेही फडणवीस यांनी म्हटले.तर यावेळी बँकेचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांनी म्हटले की, धारावीसारख्या ठिकाणी जिथे कष्टकरी, घाम गळणारे लोकं मोठ्या प्रमाणावर आहेत. अशा लोकांसाठी प्रमुख रस्त्यावर बँक हवी या भावनेतून आज या बँकेचे लोकार्पण होत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा बँकेच्या वाटचालीत एक आधारवड म्हणून मोलाचा वाटा आहे. तो आम्ही कधीही विसरू शकत नाही. केवळ नैतिक अधिकार, पाठबळ नाही तर बँकेचे आर्थिक स्थैर्य राहिले पाहिजे यासाठी शासनाच्या माध्यमातून जी मदत करता येईल ती मदत त्यांनी या बँकेला केली आहे. ही बँक सर्वसामान्यांची, कष्टकऱ्यांची बँक आहे. मुंबईत जेव्हा जेव्हा या कष्टकऱ्यांना मदत करण्याची वेळ आली तेव्हा कुठलीही बँक उभी राहिली नाही. यावेळी दरेकर यांनी गिरणी कामगार, माथाडी कामगार, पोलिसांच्या घरांसाठी मुंबई बँकेने कर्जाची मदत केल्याचेही सांगितले. तसेच जेव्हा जेव्हा या राज्यावर, देशावर संकटे आली, शहीद बांधवांच्या कुटुंबियांना सामाजिक बांधिलकीतून याच बँकेने मदत केली. निसर्ग, तौकते वादळ आले त्यावेळी कोट्यावधीची मदत मुंबई बँकेने केली. आर्थिक प्रगतीबरोबर सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेने केल्याचे दरेकर म्हणाले.दरेकर पुढे म्हणाले की, ज्यावेळेला अर्बन बँकांचा प्रश्न निर्माण झाला त्यावेळी सावंतवाडी बँक अडचणीत आली. राज्यातील बँका कशा बंद पडताहेत, ५०० पैकी २५० बँकांना टाळे लावावे लागेल अशी परिस्थिती आहे. राज्य सरकार म्हणून पुढाकार घेऊन ह्या बँका जगवल्या पाहिजेत, त्यांना ताकद दिली पाहिजे ही भुमिका मी मंत्री केसरकर यांच्याकडे मांडली. ते सहकार मंत्र्यांशी बोलले. त्यानंतर ह्या सरकारने बैठक घेतली त्या बैठकीत राज्य सरकारच्या वतीने अडचणीत असलेल्या अर्बन बँकांना २०० ते ३०० कोटी रुपये देण्याची मानसिकता या महायुती सरकारने दाखवली. त्यासाठी एक समिती गठीत केली असून एका महिन्यात सरकारला अहवाल सादर करणार आहे. सर्वसामान्यांची जाण असेल तर राज्यकर्ता निर्णय कसे घेतो ते केसरकर यांच्या कामातून आम्ही पाहिले आहे. जिल्हा बँक राज्य सरकारच्या यादीवर नव्हती असे प्रशासनाने सांगितले त्यावेळी फडणवीस, केसरकर यांच्याशी बोलून मागील मंत्रिमंडळ बैठकीत मुंबई बँकेला राज्याच्या मान्यता प्राप्त यादीवर घेतले गेले. त्यामुळे शिक्षकांचे पगार येण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचेही दरेकर यांनी सांगितले.या प्रसंगी बँकेचे ज्येष्ठ संचालक शिवाजीराव नलावडे, विधानपरिषद आमदार आणि संचालक प्रसाद लाड, माजी नगरसेवक प्रकाश दरेकर, संचालक नितीन बनकर यांच्यासह बँकेचे पदाधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# राजेंनी गादीचे वारस न होता विचारांचे वारस व्हावे:स्वराज्य मिळवताना आमच्याही पूर्वजांचे रक्त सांडले – प्रकाश शेंडगे



**धाराशिव–**मंत्री छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर केलेल्या वक्तव्यावरून मराठा व ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. त्यातच संभाजीराजे छत्रपती यांनी मंत्री भुजबळ यांचा राजीनामा घ्यावा,अशी मागणी मागणी केली आहे. याला शिवेंद्रराजे यांनी ही पाठिंबा दिला यावर ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी राजेंना सल्ला दिला असून हे शिवेंद्रराजे, संभाजीराजे हे राजे आहेत, त्यांच्याकडे आम्ही आदराने बघतो आणि हे स्वराज्य मिळवताना आमच्याही पूर्वजांचे रक्त सांडले असल्याची आठवण करून दिली आहे.ओबीसी नेते प्रकाश शेंडगे हे धाराशिव जिल्हा दौऱ्यावर असून प्रसार माध्यमांशी बोलताना त्यांनी संभाजीराजे, शिवेंद्रराजेंना सल्ला दिला आहे. आमच्याही पूर्वजांचे रक्त सांडले असल्याने त्यामुळे आमचाही अधिकार या स्वराज्यावर तितकाच आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी ही अठरापगड जमातीला सोबत घेतले म्हणून स्वराज्य मिळाले, असेही शेंडगे म्हणाले.प्रकाश शेंडगे म्हणाले की, येत्या काळात या अठरापगड जातीचे गोरगरीबांच आरक्षण टिकवण्याची जबाबदारी ही संभाजीराजे आणि शिवेंद्रराजेंची ही आहे. त्यामुळे त्यांनी केवळ गादीचे वारस न होता विचारांचे वारस व्हावे, असे मत शेंडगे यांनी व्यक्त केले आहे. मराठा समाजाने आंदोलन केंद्राच्या विरोधात करावी, हे सगळे आमच्या विरोधात चाललय, असेही यावेळी बोलताना शेंडगे यांनी स्पष्ट केले.सातारा तालुक्यातील क्षेत्रमाहुली येथे शनिवारी सायंकाळी तरुणांनी एकत्र येत महाराष्ट्राचे मंत्री व ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन केले. महाराष्ट्रात सध्या मराठा आदोलन सुरु आहे. मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांना सर्वच स्तरातून पाठींबा मिळत आहे. परंतु केवळ आपल्या राजकीय फायद्यासाठी समाजाचा वापर करत ओबीसी आणि मराठा समाजामध्ये अन्न व पुरवठा मंत्री छगन भुजबळ हे दरी निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे त्यांचा निषेध करण्यासाठी छगन भुजबळ मुर्दाबाद अशा घोषणा देत त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन क्षेत्र माहुली ता. सातारा येथे शनिवारी सायंकाळी करण्यात आले.याबाबतची माहिती अशी, मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या मागण्याबाबत सरकारने गांभीर्याने घेतल्यामुळे आता आरक्षण हे द्यावेच लागणार आहे, हे स्पष्ट होवू लागल्याने जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करण्यासाठी बेतालपणे मंत्री छगन भुजबळ हे वक्तव्य करत आहेत. त्या घटनेचा निषेध क्षेत्रमाहुली येथे तरुणांनी एकत्र येऊन त्यांचा प्रतिकात्मक पुतळा बनवून एक मराठा लाख मराठा, छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव अशा घोषणा देत छगन भुजबळ यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला आग लावली.

# भुजबळ भाजपची 'स्क्रिप्ट' वाचतात त्यांना जाधव हे कॉपी करतात, या दोघांना फडणवीसांनी पुढे केले – रोहित पवार



**बीड–**नामदेवराव जाधव हे भुजबळांची भाषा बोलतात. त्यांची कॉपी करतात आणि भुजबळ साहेब जे काही बोलतात ते भाजपची स्क्रिप्ट वाचतात. या दोन्ही नेत्यांना कोणी पुढे केले असेल ? याचा अभ्यास केला तर नाव पुढे येते, ते म्हणजे देवेंद्र फडणवीस यांचे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे.दरम्यान रोहित पवार पुढे बोलताना म्हणाले की, जाधव यांच्यावर ज्या कार्यकर्त्यांनी शाई टाकली, त्या कृत्याचे आम्ही समर्थन करीत नाही. मात्र ज्या हेतूने त्यांनी शाई टाकली, शरद पवार यांचे नाव खराब करण्याचा प्रयत्न जाधवांकडून केला जात असताना काही कार्यकर्ते गप्प बसत नाहीत. मात्र त्या कार्यकर्त्यांना काही अडचण आली तर आम्ही त्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहू. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांची युवा संघर्ष यात्रा सुरु आहे. ते बीडच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री छगन भुजबळ, आणि व्याख्याते नामदेव जाधव यांच्यावर टीकास्त्र सोडले.रोहित पवार म्हणाले की, नामदेवराव जाधव स्वतःला माता जिजाऊंचे वंशज समजतात. आता जी व्यक्ती माता जिजाऊंचे नाव चुकीच्या पद्धतीने घेते आणि वंशज आहे, असे सांगत आहे, अशांचा मी निषेध करतो. त्यांचे नाव घेऊन ते ते पुस्तक विकतात, व्यवसाय करतात, त्यांना आमदार व्हायचे आहे, जर आशा खालच्या विचाराचे व्यक्ती उद्या जाऊन काहीही बोलली आणि त्याच्यावर आम्ही प्रतिक्रिया देत असेल तर ते योग्य नाही, असेही पवारांनी म्हटले आहे.रोहित पवार म्हणाले की, भुजबळ हे भाजपची स्क्रिप्ट वाचतात आणि त्यांना नामदेव जाधव हे कॉपी करतात, या दोघांनाही पुढे करणारे म्हणजे देवेंद्र फडणवीस आहेत,असे म्हणत आमदार रोहित पवारांनी देवेंद्र फडणवीस यांच्यासह छगन भुजबळ, नामदेव जाधव यांच्यावर टीकास्त्र डागले आहे.

# मुंबईंची एवढीच चिंता असेल तर ठाकरेंनी बेल न घेता तुरुंगात जावे–नीतेश राणे



**मुंबई–**लोअर परळ उड्डाण पुलावरुन राज्यात मोठे राजकारण सुरु झाले आहे. गेली पाच वर्षे बंद असलेल्या या उड्डाण पुलाची एक बाजू काही महिन्यांपूर्वी वाहनांसाठी सुरु करण्यात आली होती. आता दुसरी बाजू आदित्य ठाकरे यांनी परवा उघडी केल्यानंतर त्यांच्यावर पालिकेने आता गुन्हा दाखल केला आहे. यावरुन मुंबईच्या एवढी चिंता असेल तर आदित्य ठाकरे यांनी बेल न घेता तुरुंगात जावे अशी टिका भाजपा नेते नीतेश राणे यांनी केली आहे.

दरम्यान नीतेश राणे पुढे बोलताना म्हणाले की, स्वत:ची सत्ता असताना आदित्य ठाकरे यांनी मुंबईकरांची एवढी चिंता कधी केली नाही. तेव्हा त्यांना बॉलीवूडच्या पार्ट्यांमधून कधी वेळ मिळायचं नाही. आणि रात्री डेव्हीड बॅकहमच्या मांडीवरून उतरून लोअर परळ ब्रिजचे अनधिकृतपणे उद्घाटन केले अशी टिका भाजपा नेते नीतेश राणे यांनी केली आहे. ते पुढे म्हणाले की आदित्य ठाकरे यांनी लक्षात ठेवावे मुंबई त्यांच्या बापाची राहीलेली नाही. आता ती मुंबईकरांची आहे. इथे चमकोगिरी चालणार नाही. महायुतीचे सरकार आहे. इथे कोणीही नियम तोडला तर त्याला शिक्षा होणारच. आता एफआयआर दाखल झाली आहे. मुंबईकरांवर खरं प्रेम असेल तर आदित्य बेल न घेता जेलमध्ये जावे अशी टिका राणे यांनी केली.नीतेश राणे म्हणाले की, लोअर परळ उड्डाण पुलावरुन राज्यात मोठे राजकारण सुरु झाले आहे. गेली पाच वर्षे बंद असलेल्या या उड्डाण पुलाची एक बाजू काही महिन्यांपूर्वी वाहनांसाठी सुरु करण्यात आली होती. आता दुसरी बाजू आदित्य ठाकरे यांनी परवा उघडी केल्यानंतर त्यांच्यावर पालिकेने आता गुन्हा दाखल केला आहे. यावरुन मुंबईच्या एवढी चिंता असेल तर आदित्य ठाकरे यांनी बेल न घेता तुरुंगात जावे अशी टिका भाजपा नेते नीतेश राणे यांनी केली आहे.

# सेनगाव तहसील व पंचायत समितीवर दलालाचा कब्जा

## कार्यालयीन कामकाजाचे वेळापत्रक दलालाच्या हातात नागरिक मात्र हतबल

**हिंगोली –**हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तहसील व पंचायत समिती कार्यालयामध्ये दलाला मार्फत होत असलेले कामकाज तात्काळ थांबऊन दलालांवर योग्य ती कारवाई करावी तसेच नागरिकांची होत असलेली गैरसोय दूर करून, कार्यालयीन कामकाज वेळेवर पूर्ण करण्यासंदर्भात निर्देश द्यावेत, जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हिंगोली यांच्याकडे अखिल भारतीय भट्राचार निर्मूलन संघर्ष समिती तथा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ यांची निवेदनाद्वारे मागणी .

सेनगाव तहसील व पंचायत समितीमध्ये कार्यालयीन कामकाज वेळेवर पूर्ण होत नसल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.यासोबतच आर्थिक पिळवणूकही होत आहे. प्रशासकीय अधिकारी आपल्या मर्जीतील दलालांमार्फत टेबलाखालुन लाच स्वीकारुन पडद्याआडून काम करत असल्यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा खर्च होऊन नागरिकांची पळवणूक होत आहे. त्यामुळे या कार्यालयातील कामकाज वेळेवर पूर्ण करावे व कार्यालयांचे कामकाजामध्ये हस्तक्षेप करणाऱ्या दलालावर योग्य ती कारवाई करून नागरिकांची गैरसोय दूर करावी असी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती ब्रिक्स हुमान राईट मानव अधिकार मिशनच्या माध्यमातून हिंगोली जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे कार्यालयीन कामकाज शासन पत्रकाप्रमाणे वेळेत पूर्ण करण्यासंदर्भात निर्देश देणे व दलालांच्या माध्यमातून चालत असलेले कामकाज तात्काळ बंद करून नागरिकांची होत असलेली गैरसोय दूर करण्यासाठी आवश्यक सुचना द्याव्यात संबंधित महसूल विभागातील शेत जमीन खरेदी-विक्री ,फेरफार नावे घेण्यासाठी चुकीचे कारण दाखवून प्रस्ताव वरिष्ठाकडे पाठवले जातात त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ व पैसा खर्च होतो. वरिष्ठांच्या मर्जीप्रमाणे आणि दलालांच्या मदतीने फेरफार नोंद केल्या जाते व आर्थिक वसुलीही केली जात असल्याचेही म्हटले आहे. सेनगाव तहसील व पंचायत समिती कार्यालयामार्फत होत असलेले कार्यालयीन कामकाज शासन पत्रकाप्रमाणे वेळेत पूर्ण करण्यासंदर्भात संबंधित कार्यालय प्रमुखाला निर्देश देऊन नागरिकांची होत असलेली गैरसोय व पिळवणूक दूर करण्यासाठी आवश्यक सुचना द्याव्यात. संबधिंत प्रशासकीय यंत्रणेचे अधिकारी आपापल्या मर्जीतील दलाला मार्फत काम करत असल्याचे पाहायला मिळत आहे. पोलीस स्टेशनला संबंधित दलालांची नांवे देऊन कार्यालयाबाहेर दलालाच्या नावाचा फलक लावून त्यांची नावे उघड करुन योग्य ती कारवाई करावी. जेणेकरून नागरिकांना या दलालाच्या कचाट्यातुन व तावडीतून सुटका मिळेल. आणि नागरिकांची गैरसोय दूर होण्यास मदत मिळेल. नागरिकांना कार्यालयामध्ये वेळोवेळी चकरा माराव्या लागनार नाहीत त्यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा खर्च होनार नाही व पैशाचा अपव्यय होणार नाही पुरवठा विभागात सावळा गोंधळ पायाला मिळत आहे. स्वस्त धान्य दुकानदार म्हणतात राशनचा माल वेळेवर पूर्ण मिळत नाही. पुरवठा विभागाचे अधिकारी अरेरावेची व मुजोरीची भाषा करतात. त्यांच्या वादात लाभार्थी मात्र वंचित राहतात, हतबल होतात. तक्रार कोणाकडे करावी कळत नाही कारण शेत कुंपन खात आहे. कार्यालय प्रमुख झोपेचं सोंग घेत आहेत कार्यालयामध्ये अधिकारी वेळेवर हजर राहत नसतात कोण अधिकारी केव्हा येणार याची माहिती कुणालाच मिळत नाही. फिरून फिरून चकरा माराव्या लागतात आज उद्या शेवटीं दलाला मार्फत काम पूर्ण केले जाते ही बाब अत्यंत गंभीर आहे. संबंधित कार्यालय प्रमुखांचे कार्यालयामार्फत कार्यालयीन कामकाजाकडे कुठल्याच प्रकारचे लक्ष व नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे कारण कार्यालयामध्ये कार्यालयीन कामकाजाचे वेळापत्रकाचे फलक लावलेले नसून नागरिकांची सनद देखील लावलेली नाही. माहिती अधिकार फलक सुद्धा लावलेला नाही .त्यामुळे कोणता अधिकारी कोणत्या टेबलवर बसतो केव्हा येतो, केव्हा जातो. आपल्या सोयीनुसार काम करतो. नागरिक मात्र चकरा मारून मारून थकून जातात आणि दलालांच्या माध्यमातून संपर्क केला जातो. दलालांच्या म्हणण्याप्रमाणे नागरिकांना आपले काम करून घ्यावे लागते निराधार लाभार्थी यांची फाईल टेबलावर आली की , पुर्णपणे कंप्लीट असतांनाही जाणुन बुजुन त्रुटी मध्ये काढलीं जाते आणि कम्प्युटरमध्ये पूर्णपणे अपलोड करत नाहीत. लाभार्थी चकरा मारून मारून थकून जातो .शेवटी दलालाच्या माध्यमातून पैशाची देवाण-घेवाण करून फाईल पूर्ण केली जाते त्यामुळे नागरिकांची गैरसोय आणि पिळवणूक होत आहे..मोहोदय मोहदया सेनगाव तहसील व पंचायत समिती कार्यालयामध्ये दलालांच्या मार्फत चालत असलेली कामे तात्काळ थांबून शासन परिपत्रकाप्रमाणे नागरिकांना सेवा उपलब्ध करून द्यावी .आणि नागरिकांची होत असलेली गैरसोय आणि पिळवणूक दुर करावी.असी मागणी अखिल भारतीय भट्राचार निर्मूलन संघर्ष समिती ब्रिक्स हुमन राईट्स मिशनच्या वतीने जिल्हाधिकारी हिंगोली यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली या प्रसंगी उपस्थित राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर बाबा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पंडितराव तिडके जिल्हा अध्यक्ष बालाजी वानखेडे विभागीय अध्यक्ष शंकरराव देशमुख जिल्हा अध्यक्षा वंदनाताई थिटे, जिल्हा अध्यक्षा ब्रिक्स ह्युमन राईट्स सुवर्णाताई आकमार जिल्हाध्यक्ष किसान विभाग गजानन टेकाळे तालुका अध्यक्ष आकडे मामा तालुकाध्यक्ष वसमत शेख जावेद अन्सारी सह पदाधिकारी उपस्थित होते.

# आज मोदी व शहा हेच निवडणूक आयोग-संजय राऊत

**मुंबई–**भारताचा सध्याचा निवडणूक आयोग म्हणजे एक भंपकपणाचे प्रतीक बनला आहे. निवडणूक आयोगाचा आता पिंजऱ्यातला पोपट झाला आहे. पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांच्या निमित्ताने ते सिद्ध झाले, अशी घणाघाती टीका आज ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी केली.ठाकरे गटाचे मुखपत्र असलेल्या सामनाच्या रोखठोक सदरातून संजय राऊतांनी नरेंद्र मोदी, अमित शहांवर निशाणा साधला आहे. संजय राऊत म्हणाले,भाजपच्या पायाखालची वाळू या निवडणुकीत सरकली आहे. नरेंद्र मोदी, अमित शहांपासून सर्वच भाजप नेत्यांच्या चेहऱ्यावरचे रंग उडाले आहेत. त्यामुळे 'धार्मिक' प्रचार करून बुडती नौका वाचवणे हेच त्यांचे धोरण बनले आहे.संजय राऊत म्हणाले, मध्य प्रदेशातील 'गुणा' येथे देशाचे गृहमंत्री अमित शहा प्रचारास गेले व त्यांनी जाहीर केले की, मध्य प्रदेशात भाजप सरकार आणा आणि रामलल्लांचे मोफत दर्शन घ्या. जनतेला रामाचे मोफत दर्शन घडवू. त्याचा खर्च भाजप करील. श्री. अमित शहा यांचे हे विधान सरळ सरळ धार्मिक प्रचारात मोडते. मतदारांना 'लाच' देऊन मते मागण्याचा हा प्रकार धक्कादायक आहे व यावर देशाचा निवडणूक आयोग मूग गिळून व डोळे बंद करून बसला, हे लोकशाहीस मारक आहे.संजय राऊत म्हणाले, हिंदुत्वाचा पुरस्कार करणे वेगळे व निवडणुकीत हिंदुत्वाचा प्रचार करून मते मागणे वेगळे. जुलै १९९९ मध्ये केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा मतदानाचा अधिकार सहा वर्षांसाठी काढून घेतला होता. केवळ मतदानच नव्हे, तर निवडणुकीलाही उभे राहण्यास मनाई केली होती. हिंदुत्वाच्या म्हणजेच धर्माच्या नावावर मते मागितल्याचा त्यांच्यावर ठपका होता. हिंदुत्वासाठी एखाद्या नेत्याने केलेला हा सर्वोच्च त्याग होता. रमेश प्रभू, सूर्यकांत महाडिक, रमाकांत मयेकर या शिवसेना आमदारांना हिंदुत्वाच्या मुद्द्यावर आमदारक्या गमवाव्या लागल्या. आज हिंदुत्वाची ठेकेदारी चालवणाऱ्या भाजपला हिंदुत्वासाठी असा त्याग व संघर्ष कधीच करावा लागला नाही.संजय राऊत म्हणाले, निवडणूक आयोग व इतर घटनात्मक संस्थांना 'मॅनेज' करून ते हिंदुत्वाच्या लढाया लढले. त्या लढाया लुटूपुटूच्या होत्या. पाकिस्तानवर 'सर्जिकल स्ट्राईक' केला व त्यावर भारत-पाकिस्तान, हिंदुत्व हे मुद्दे आणून २०१९ च्या निवडणुकीत ते उतरले. 'कश्मीर फाईल्स' चित्रपट व पंडितांचे 'टार्गेट किलिंग' या मुद्द्यांवर त्यांनी भावना भडकवून हिंदू मते मागितली, पण पंडितांचे भले झाले नाही. कधी हिजाब तर कधी बजरंग बलीस प्रचारात उतरवून पंतप्रधान मोदी व



त्यांच्या लोकांनी निवडणूक आचारसंहितेचा सरळ भंग केला तरीही निवडणूक आयोग नामक पोपटाने साधी फडफड केली नाही. आता तर अमित शहांनी मध्य प्रदेशच्या मतदारांना 'राम लल्ला'च्या नावाने साकडे घातले. हे एखाद्या काँग्रेसच्या पुढाऱ्याने केले असते तर एव्हाना 'ईडी'प्रमाणे निवडणूक आयोगाचे वारंट त्याच्या घरी पोहोचले असते.संजय राऊत म्हणाले, देशाचे दिवंगत मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांचे नाव नव्या पिढीस माहीत नाही. कारण आज मोदी व शहा हेच निवडणूक आयोग बनले आहेत. तसे नसते तर फक्त चाळीस आमदारांनी पक्षांतर केले म्हणून 'शिवसेना' हा बाळासाहेब ठाकरे यांचा पक्ष व धनुष्यबाण हे चिन्ह सोम्यागोम्यांच्या हातात सोपवले नसते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचेही तेच होईल, पण शेषन हे निवडणूक आयुक्त असताना बनेल राजकारण्यांना वठणीवर आणण्याचे महत्कार्य त्यांनी केले. त्यामुळे ते सामान्य लोकांचे 'हीरो' बनले. पंतप्रधानांच्या दौऱ्याचा खर्चही त्या मतदारसंघातील उमेदवारांत वाटला जाईल, असे तेव्हा शेषन यांनी जाहीर केले होते व सत्ताधाऱ्यांचे धाबे तेव्हा दणाणले होते.संजय राऊत म्हणाले, धर्म, जात, पंथ या आधारावर मते मागणारे सत्तेत आहेत व निवडणूक आयोग त्यांच्या पकडीत आहे. भाजपच्याच राजवटीत उरीपासून पठाणकोट, पुलवामाचे अतिरेकी हल्ले झाले, पण त्या हल्ल्यांत मेलेल्यांच्या हौतात्म्याचा बाजार भरवून पंतप्रधानांसह भाजपचे नेते मते मागत फिरले. पुलवामाचे हत्याकांड म्हणजे सरकारची बेफिकिरी व त्यामुळे सदोष मनुष्यवध ठरतो, पण त्या हौतात्म्यावर मते मागितली जात असताना निवडणूक आयोग मूक-बधिर अवस्थेत दिल्लीच्या निर्वाचन आयोगात बसून होता. हे भयंकर आहे. अशा निवडणूक आयोगाकडून आता स्वतंत्र, निष्पक्ष निवडणुकांची अपेक्षा का करावी? बजरंग बलीचा नारा देत भाजपास मतदान करा, असे देशाचे पंतप्रधान प्रचार सभेत सांगतात. मध्य प्रदेशात भाजपची सत्ता आली तर तेथील जनतेस 'अयोध्यावारी'चा लाभ देऊ. तोही मोफत, असे देशाचे गृहमंत्री जाहीर करतात. देशाला निवडणूक आयोग आहे काय? असा प्रश्न त्यामुळे पडतो.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .